Rayat Shikshan Sanstha's

**Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur**

**Department of Sociology**

# Visit to Matoshri Old Age House

**Date : 10/07/2017**



## मातोश्री वृद्धाश्रमास भेट

**कोल्हापूर** : राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजच्या समाजशास्त्र विभागाच्यावतीने रजपूतवाडी येथील भटका व विमुक्त समाज विकास मंडळ संचलित आश्रमशाळा व चंबुखडी येथील मातोश्रथी वृद्धाश्रमास भेट दिली. आश्रमशाळेचे कार्यवाहक प्रा. सुनील भोसले यांनी शाळेची माहिती दिली. यावेळी समाजशास्त्र विभागाच्यावतीने आश्रमशाळेस आर्थिक मदत देण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमास भेट देऊन त्यांच्याशी संवाद साधला. प्रा. बी. आर. नदाफ, प्रा. एक. के. कन्नाडे यांनी भेटी संयोजन केले होते.

डायरी

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE ★ KOLHAPUR

## विद्यार्थ्यांची वृद्धाश्रमास भेट

कोल्हापूर, ता. १२ : कदमवाडी येथील राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजमधील समाजशास्त्र विभागातर्फे चोकाक येथील मारुतीराव साळोखे वृद्ध व अर्धांगवायूग्रस्त सेवा मंडळ वृद्धाश्रमास भेट दिली. विद्यार्थ्यांनी वृद्धांशी संवाद साधला. कमल ननवरे, कृष्णाबाई सासने उपस्थित होत्या. संचालिका चंद्रप्रभा शिंदे यांनी मार्गदर्शन केले. मयनावती कारटे यांनी कवी माधव ज्युलियन यांच्या 'आई' काव्यातून मानवी जीवनातील आईचे महत्त्व सांगितले. समाजशास्त्र विभागामार्फत वृद्धाश्रमास धान्य, कपडे, फळे, सुकामेवा, एकवेळचे जेवण भेट दिले. प्राचार्य डॉ. राजेंद्र कुमार यांनी मार्गदर्शन केले. विभागप्रमुख बी. आर. नदाफ यांनी प्रास्ताविक केले. प्रा. सौ. एम. के. कन्नाडे यांनी आभार मानले.

## राजर्षी शाहू कॉलेज समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांची वृद्धाश्रमास भेट

**कोल्हापूर (प्रतिनिधी)** - राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजमधील समाजशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी मारुतराव साळोखे वृद्ध व अर्धांगवायूग्रस्त सेवा मंडळ, चोकाक या वृद्धाश्रमास भेट दिली. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमाची माहिती घेऊन ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधला. वृद्धाश्रमाच्या संचालिका चंद्रप्रभा शिंदे यांनी स्वागत केले. समाजशास्त्र विभागप्रमुख बी.आर.नदाफ यांनी प्रास्ताविक केले. प्रा.एम.के.कन्नाडे यांनी आभार मानले.

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE KOLHAPUR

**रयत शिक्षण संस्थेचे**

**राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर**

**समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांची वृद्धाश्रमास भेट**

दिनांक-१०/०७/२०१७

समाजशास्त्र विभागातर्फे चोकाक येथील मारुतीराव साळोखे वृद्ध व अर्धांगवायूग्रस्त सेवा मंडळ वृद्धाश्रमास भेट देऊन वृद्धांशी विविध अडचणी संदर्भात संवाद साधण्यात आला. यावेळी कमल ननवरे, कृष्णाबाई सासने उपस्थित होत्या. संचालिका चंद्रप्रभा शिंदे यांनी मार्गदर्शन केले. मयनावती वरुटे यांनी कवी माधव ज्युलियन यांच्या 'आई' काव्यातून मानवी जीवनातील आईचे महत्त्व सांगितले. समाजशास्त्र विभागामार्फत वृद्धाश्रमास धान्य, कपडे, फळे, सुकामेवा, एकवेळचे जेवण भेट दिले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी मार्गदर्शन केले. विभागप्रमुख बी. आर. नदाफ आणि. प्रा. सौ. एम. के. कन्नाडे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. सदर कार्यक्रमामध्ये विभागातील १४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE KOLHAPUR

Nadaf

Head

Department of Sociology

Rajarshi Chh. Shahu College, Kolhapur.